**प्रेसनोट दि. ०६.०७.२०२१**

श्री. कुमार काका वायदंडे वय ५५ वर्ष सहाय्यक पोलीस फौजदार पोलीस ठाणे शिराळा यांना २०००/- रूपये लाच स्विकारताना पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे भावांच्या विरूध्द शिराळा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचे कामी सहकार्य करण्यासाठी शिराळा पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस फौजदार श्री. वायदंडे यांनी तक्रारदार यांचेकडे २०००/- ते ३०००/- रूपये पर्यंत खर्च येईल असे म्हणून लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०६.०७.२०२१ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक ०६.०७.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये शिराळा पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस फौजदार श्री. वायदंडे यांनी तक्रारदार यांचे भावांच्या विरूध्द दाखल असले गुन्हयामध्ये सहकार्य करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे २०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच शिराळा पोलीस ठाणे येथे सापळा लावला असता श्री. कुमार काका वायदंडे वय ५५ वर्ष सहाय्यक पोलीस फौजदार पोलीस ठाणे शिराळा यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून २०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असताना त्यांना पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. कुमार काका वायदंडे वय ५५ वर्ष सहाय्यक पोलीस फौजदार पोलीस ठाणे शिराळा यांचे विरुध्द शिराळा पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार सलिम मकानदार, अविनाश सागर, सिमा माने, अजित पाटील, राधिका माने, संजय कलगुटगी, रविंद्र धुमाळ, प्रितम चौगुले चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner